**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ३० ऑगस्ट २०२६**

**ठळक बातम्या**

1. **'अंमली पदार्थमुक्त युवा' ही मोहीम युवा वर्गाच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा सामूहिक संकल्प असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात'मध्ये प्रतिपादन.**
2. **पंतप्रधान मोदींना उझबेकिस्तानकडून सर्वोच्च सन्मान 'ओली दराजाली दोस्तलिक' प्रदान.**
3. **नेपाळमध्ये काठमांडू इथं अडकलेले नागपूरचे १०२ यात्रेकरू सुरक्षितरित्या राज्यात दाखल.**

**आणि**

4. **वर्धा शहर महाराष्ट्रातील पहिले 'पुस्तकांचे शहर' म्हणून विकसित करण्यात येणार.**

**आता सविस्तर बातम्या .......**

मन की बात

'विकसित भारतासाठी अमली पदार्थमुक्त युवा' ही मोहीम म्हणजे देशाच्या युवा वर्गाचं आरोग्य, आनंद आणि उज्ज्वल भविष्यासाठीचा सामूहिक संकल्प असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधत होते. हा या कार्यक्रमाचा एकशे सदतीसावा भाग होता. अमली पदार्थाविरोधात जनजागृती करणाऱ्यांचं तसंच या व्यसनाशी झुंज देणाऱ्यांना मदत करणाऱ्यांची त्यांनी प्रशंसा केली. ही मोहीम प्रभावी ठरावी यासाठी देशातल्या 'आशय निर्मात्यांनी' विविध भाषांच्या माध्यमातून योगदान द्यावं, तसंच यासाठी 'नशामुक्त युवा' हा 'हॅशटॅग' वापरावा, असं आवाहनही त्यांनी केलं. राष्ट्रीय हातमाग दिन, भारत छोडो आंदोलन स्मृतिदिन, फाळणी वेदना स्मृती दिन, स्वातंत्र्य दिन आणि राष्ट्रीय अंतराळ दिन यामुळे ऑगस्ट महिना विशेष ठरल्याचं त्यांनी सांगितलं. 'हर घर तिरंगा' मोहिमेअंतर्गत यंदा ८ कोटींपेक्षा

जास्त ‘सेल्फी-विथ-तिरंगा’ अपलोड झाल्याची माहिती त्यांनी दिली. ‘सूर्यपथ तिरंगा’ या उपक्रमामुळे हा उत्सव जगभरात पोहोचल्याचं ते म्हणाले. या प्रयत्नांमुळे समाज एकत्र येतो आणि देशाशी असलेलं नातं अधिक दृढ होतं असं त्यांनी सांगितलं.

पीएम स्वनिधी योजनेतील यशोगाथा, मणिपुरमधील यशस्वी फुलशेती, नागरिकांचे स्वयंस्फूर्त स्वच्छता अभियान, नावोन्मेषाच्या क्षेत्रातील मिशन शक्तीसट, ॲव्होकॅडोची शेती, अभिनेते उत्तम कुमार यांचे जन्मशताब्दी वर्ष या विषयांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले विचार व्यक्त केले. मुंबईच्या कृष्ण शेषाद्री यांनी तयार केलेल्या 'भारत राज्य डॉट कॉम' या संकेतस्थळाचा उल्लेख करून मोदी यांनी त्यांच्याशी संवाद साधला. आपले सण आणि उत्सव, आपल्याला परंपरांबरोबरच परस्परांशी जोडले जाण्याची संधीही देतात, असं ते म्हणाले. आगामी सण उत्सवांच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी ‘व्होकल फॉर लोकल’ या मंत्राचा अंगिकार करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

उझबेकिस्तान सन्मान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उझबेकिस्तानचा सर्वोच्च राजकीय सन्मान ‘ओली दराजाली दोस्तलिक’ देऊन गौरवण्यात आलं. उझबेकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष शौकत मिर्झियोयेव यांनी आज मोदी यांना या सन्मानाने गौरवलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ताश्कंद येथे उझबेकिस्तानच्या राष्ट्राध्यक्षांसोबत शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा केली. दोन्ही देशांनी धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत करण्यासोबतच सामायिक विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकत्रितपणे काम करण्यावर भर दिला. भारत आणि उझबेकिस्तानने व्यापार आणि गुंतवणूक, डिजिटल संपर्क, संरक्षण तसेच ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यावर सहमती दर्शवली.

नेपाळ पुर

नेपाळमधल्या नैसर्गिक आपत्तीमुळे काठमांडू इथं अडकलेले नागपूरचे १०२ यात्रेकरू आज सकाळी सुरक्षितपणे राज्यात परतले. विदर्भातले आणखी ४ यात्रेकरू काल नागपूर इथं पोहोचले. नेपाळमधल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ७३४ वर पोहोचली असून जवळजवळ अडीच हजार लोक अद्याप बेपत्ता आहेत. यामध्ये ८५ सुरक्षा कर्मचारी आणि ३२० परदेशी नागरिकांचा समावेश आहे. नेपाळमधल्या पूरग्रस्त भागातून आतापर्यंत १०८ भारतीय नागरिकांची सुटका

करण्यात आली असून, ५० नागरिकांशी पुन्हा संपर्क प्रस्थापित झाल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. २७५ भारतीय नागरिक अद्याप बेपत्ता असल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान नेपाळमधल्या बचाव आणि मदत कार्यासाठी भारतातून ११ टन मदतसामग्री घेऊन चौथं विमान काठमांडूमध्ये दाखल झालं असून, ही मदतसामग्री नेपाळ सरकारकडे सुपूर्द करण्यात आल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर यांनी सांगितलं.

नेपाळ पुर मृतदेह

नेपाळमध्ये पुरात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांचे मृतदेह कुजण्यास सुरुवात झाली असून, वेगाने कुजणाऱ्या मृतदेहांमधून येणाऱ्या दुर्गंधीमुळे आता बाधित भागांमध्ये साथीचे आजार पसरण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नेपाळ सरकार ओळख पटली नसलेल्या मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याच्या तयारीत आहे. प्रत्येक अनोळखी मृतदेहाचा डीएनए नमुना जतन करून ठेवला जाणार आहे.

उपमुख्यमंत्री शिंदे

राज्यातील शेतकर्यांसह लाडक्या बहिणी आणि युवकांच्या पाठीशी केंद्र आणि राज्यातील हे डबल इंजिन सरकार खंबीरपणे उभे राहील आणि विकास कामांकरीता निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज परभणीत आयोजित केलेल्या शेतकरी आणि युवा संवाद मेळाव्यातून दिली. सरकारच्या तिजोरीवर सर्वसामान्य शेतकर्यांचा पहिला हक्क आहे, असे नमूद करीत शिंदे यांनी महायुती सरकारने आपल्या कारकिर्दीत सातत्याने शेतकरी हिताचेच निर्णय घेतले आहेत, असं प्रतिपादन केलं.

वर्धा पुस्तकांचे शहर

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांची कर्मभूमी असलेले वर्धा शहर महाराष्ट्रातील पहिले ‘पुस्तकांचे शहर’ म्हणून विकसित करण्यात येणार आहे. तसेच वर्ध्यातील सुरगाव हे ‘कवितांचे गाव’ म्हणून ओळखले जाणार आहे. उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत ही महत्त्वपूर्ण घोषणा केली. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या विशेष मागणीची दखल घेत मराठी भाषा विभागाने हा निर्णय घेतला आहे. या उपक्रमांतर्गत येत्या दोन महिन्यांत ३५ हजार पुस्तके वर्ध्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय, पुढील एका

महिन्यात वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र मराठी भाषा विभाग सुरू करण्यात येणार आहे. या विभागासाठी स्वतंत्र मराठी भाषा अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाईल. त्यामुळे मराठी भाषेशी संबंधित प्रशासकीय कामकाजाला गती मिळण्यास मदत होणार आहे.

मोहन भागवत

भारत शतकानुशतके ‘वसुधैव कुटुंबकम’ या अमूल्य विचाराने जगाकडे पाहतो. त्यामुळे धर्म आणि उपासनेच्या पद्धती वेगवेगळ्या असू शकतात; मात्र संपूर्ण मानवजात एकच आहे, असे आम्ही मानतो, असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केलं . काल न्यूयॉर्कमध्ये आयोजित ‘वन वर्ल्ड, वन ह्युमॅनिटी’ या कार्यक्रमातून त्यांनी जगभरातील समुदायांशी संवाद साधला. न्यूयॉर्कमधील मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये आयोजित 'युनिव्हर्सल वननेस सेलिब्रेशन' कार्यक्रमात पाच हजाराहून अधिक भारतीय वंशाचे अमेरिकन सहभागी झाले होते. याचे आयोजन अमेरिकन हिंदूज फॉर एंगेजमेंट अँड डायलॉगने केलं होतं.

छत कोसळले

बुलढाणा जिल्ह्यात शेगाव इथं मध्यवर्ती बसस्थानकाच्या फलाट क्रमांक १० चे सिमेंटचे छत काल सायंकाळी अचानक कोसळल्याने त्याखाली बसची वाट पाहत उभे असलेले ४ प्रवासी जखमी झाले. जखमींमध्ये एक महिला आणि लहान मुलाचाही समावेश आहे. बसस्थानक इमारतीच्या निकृष्ट दर्जाबाबत संताप व्यक्त केला जात असून, प्रशासनाने धोकादायक भागाची तातडीने दुरुस्ती करावी आणि जखमींना योग्य मदत द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

संत्रा संकट

अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यात यंदा पावसाचे प्रमाण अपेक्षेच्या तुलनेत कमी राहिल्याने त्याचा विपरित परिणाम संत्रा बागांवर होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. कमी पावसामुळे संत्रा बागांमध्ये प्रतिकूल वातावरण निर्माण होऊन विविध किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी संत्र्याची फळगळ सुरू झाली असून, अनेक शेतकऱ्यांच्या बागांमधील तोंडाशी आलेला बहार गळून पडत असल्याने संत्रा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

महिला टी-२०

आशिया चषक T20 क्रिकेट स्पर्धेत आज भारतीय महिला संघाचा सामना थायलंड बरोबर होणार आहे. दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर भारतीय वेळेनुसार रात्री साडे आठ वाजता हा सामना सुरू होईल. हरमनप्रीत कौर भारतीय संघाचं नेतृत्व करेल, तर स्मृती मंधाना उपकर्णधार असेल.

हवामान

हवामान! विदर्भात एक सप्टेंबर पर्यंत पावसाचा अंदाज नाही मात्र दोन सप्टेंबरला गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यात तर 3 सप्टेंबरला नागपूर, भंडारा आणि अमरावती जिल्ह्यांत मुसळधार पावसाचा अंदाज प्रादेशिक हवामानाने दिला आहे. दरम्यान, येत्या काही तासांत पूर्व विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे.

****